# डॉ. बेंडाळे महिला महाविद्यालयात GST Women Empowerment through skill Building वर्कशॉपचे उद्‌घाटन

जळगाव : (दि. १ जुलै) येथील डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालयात The Institute of Chartered Accountants of India, Jalgaon (WIRC) आणि वाणिज्य व अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने GST - Women Empowerment through Skill Building या विषयांतर्गत ०५ दिवसीय कार्यशाळेचे उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. राणे, प्रमुख पाहुणे C. A. अजय जैन, प्रमुख वक्ते C. A. प्रिती मंडोरे व महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. बी. पी. सावखेडकर व महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. आर. एन. महाजन तसेच डॉ. अशोक खाचणे (अर्थशास्त्र विभाग प्रमुख) व प्रा. आर. आर. ठोसरे (वाणिज्य विभाग प्रमुख) उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या C. A. प्रिती मंडोरे यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत असतांना कौशल्य बांधणीतून महिलांचे सबलीकरण घडून येईल असे सांगितले. GST संदर्भात माहिती देतांना एक देश एक कर सर्वत्र लागू केला व देशाच्या विकास घडवून आणला व GST हा फक्त कर नसून GGJO आहे असे सुचविले (Good Great Job Opportunity) असल्याचे सांगितले. तसेच कोणत्याही क्षेत्रात प्रामाणिकपणे व मेहनतीने कार्य केल्यास यातून मोठया प्रमाणात यश मिळविता येते. तसेच GST लागू झाल्यापासून अनेक रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत असे सांगितले तर अध्यक्षीय विचार व्यक्त करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. राणे यांनी २००६ पासून GST हा कर लागू करण्यासाठी प्रयत्न केले जात होते तो २०१७ ला लागू झाला व एक प्रकारे काळया पैशाला आळा घालण्यात आला. परिणामी कर वेळेवर भरला जावून देश विकसित होईल व यात कर प्रणाली समजून घेण्यासाठी वाणिज्य क्षेत्रात मोठया प्रमाणावर रोजगार प्राप्त होईल. देशातील चलन विनिमयासाठी अकाउंटंटची आवश्यकता असते व ही संधी GST तून निर्माण झाली आहे व एकदा आलेली संधी पुन्हा येत नाही असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अशोक खाचणे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. विनोद नन्नवरे, प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. निलेश कोळी यांनी तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. शिल्पा सुराणा यांनी केले. सदर कार्यक्रमास प्राध्यापकवृंद व विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.

